ठाणे, शनिवार दि. ३ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ९६ पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**न्यायालयाचे मौन**

निवडणूक रोखे व्यवहार प्रकरणावरून भारतीय जनता पार्टीवर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. त्यानंतर विरोधक या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी करत होते. .......पान २ वर



कल्याणच्या सहजानंद चौकात होर्डिंग कोसळून अपघात

...पान ४ वर

# लाडकी बहीण योजनेला लागणार ब्रेक ?

**मुंबई: आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना मानल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. कारण मुंबई उच्च न्यायालयात लाडकी बहीण योजनेविरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे. मंगळवारी या याचिकेवर तातडीची सुनावणी होणार आहे. त्यामुळे या याचिकेचा निकाल काय लागणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.**

नवी मुंबईतील नावेद मुल्ला यांनी ही याचिका न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेत १४ ऑगस्टला वितरीत करण्यात येणारा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे. विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून राज्य सरकारने ही योजना सुरु केली आहे. ही भ्रष्ट कृती असून हा मतदारांना आमिष दाखवण्याचा प्रकार आहे. निवडणुकीत पैसे वाटल्यास निवडणूक आयोगाकडून कारवाई केली जाते. मात्र, सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू नसल्यामुळे निवडणूक आयोग कारवाई करु शकत नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे.

### उच्च न्यायालय लाडकी बहीण योजनेला स्थगिती देणार का ?

एरवी सामान्य लोकांनी साधं चॉकलेट घेतलं तरी त्यावर जीएसटी भरावा लागतो. अन्य गोष्टींवरही सामान्य जनता २८ टक्क्यांपर्यंत जीएसटी कर भरते. हे पैसे फुकट वाटण्यासाठी नाहीत. लाडकी बहीण योजना म्हणजे करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता मुंबई उच्च न्यायालय मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला स्थगिती देणार की नाही, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

### खळबळजनक दावा : लाडकी बहीण योजनेचे पैसे दोन महिन्यांत बंद होणार: संजय राऊत

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना म्हणजे जनतेची फसवणूक आहे. आता विधानसभा निवडणूक आहे पण दोन महिन्यांनी लाडक्या बहिणीला काही मिळणार नाही, असा दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला. महायुती सरकार राज्यावर कर्जाचा डोंगर करेल आणि पळून जाईल. लाडक्या बहीण योजनेसाठी राज्य सरकारच्या तिजोरीतील पैसा वापरला जात आहे. पण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि आमदारांकडे ठेकेदार आणि जनतेकडून लुटलेले पैसे आहेत, असे संजय राऊत यांनी म्हटले.



- उच्च न्यायालयात याचिका
- मंगळवारी सुनावणी

### काय म्हणाले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, लाडक्या बहिणींना माझा नमस्कार! ताई तुमच्यासाठी आम्ही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. त्या योजनेला तुम्हा सर्वांचा भरभरुन प्रतिसाद मिळत आहे, त्यासाठी मनापासून धन्यवाद... ताई कोणीही कितीही विरोधात बोलले तरी तू काळजी करु नको.. राज्यातील महायुती सरकार तुझ्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. तुझ्या अर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य आणि पोषणासाठी तुला महिन्याला १५०० रुपये म्हणजे वर्षाला १८००० रुपये देण्याचा निर्णय या भावाने घेतला आहे. योजनेला मिळणारा प्रतिसाद आणि नाव नोंदणीसाठी झालेली गर्दी पाहून अर्जाची मुदत वाढवून ती ३१ ऑगस्ट करण्यात आली आहे. ज्या भगिनी ३१ ऑगस्टला नोंदणी करतील त्यांना देखील जुलैपासूनचे पैसे देण्यात येणार आहे.

### मनू भाकर पुन्हा एकदा फायनलमध्ये



पॅरिस: पॅरिस ऑलिम्पिकमधून भारतासाठी गुड न्यूज समोर आली आहे. भारताची नेमबाज मनू भाकरनं महिला २५ मीटर एअर पिस्टल प्रकरात अंतिम फेरीत पोहोचली आहे. मनूनं यापूर्वी दोन पदकं जिंकली असून तिला तिसरं पदक मिळवण्याची संधी आहे. मनू भाकरनं यापूर्वी १० मीटर एअर पिस्टल प्रकारात भारताला पहिलं कांस्यपदक मिळवून दिलं होतं. त्यानंतर सरबज्योत सह १० मीटर एअर पिस्टल मिश्र दुहेरी मनू भाकरनं आणखी कांस्य पदक देशाला मिळवून दिलं. दोन कांस्य पदकांवर नाव कोरल्यानंतर देशातील नागरिकांना मनू भाकरनं सुवर्ण पदक जिंकेल अशी आशा आहे. याची अंतिम फेरीची लढत उद्या होणार आहे. मनू भाकरनं ऑलिम्पिकमध्ये दोन पदकं जिंकली आहेत. मनू भाकरनं १० मीटर एअर पिस्टल एकेरी मध्ये कांस्य पदक मिळवून दिलं होतं. (पान २ वर)

नाव बदललं की, काही लोक समर्थनार्थ आणि विरोधात असणारच आहेत...
–सर्वोच्च न्यायालय



# संभाजीनगर, धाराशिव नामांतरप्रकरणी हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

## नामांतर प्रकरणाची याचिका फेटाळली

**औरंगाबाद आणि उस्मानाबाद नामांतर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या नामांतराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव नामांतरप्रकरणी हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. नाव देण्याचा आणि बदलण्याचा अधिकार कायद्यानं राज्य सरकारला दिलेला आहे, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं आहे.**

नाव बदललं की, काही लोक समर्थनार्थ आणि विरोधात असणारच आहेत, असंही सर्वोच्च न्यायालयानं सुनावणी दरम्यान म्हटलं आहे. त्याचप्रमाणे सर्वात महत्त्वाचा मुद्दा देखील सर्वोच्च न्यायालयानं सुनावणी दरम्यान अधोरेखीत केला आहे. अलहाबाद आणि औरंगाबाद प्रकरण एकसारखं नाही, असंही सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

### सर्वोच्च न्यायालयानं याचिका फेटाळली

महाराष्ट्रातील दोन शहरांची नावं बदलल्याच्या विरोधातील याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली आहे. नाव बदलणं हा राज्य सरकारचा अधिकार आहे. त्यासाठी, न्यायालयीन पुनरावलोकनाची गरज नाही. हायकोर्टानं तुमचं म्हणणे ऐकून घेऊन सविस्तर आदेश दिले आहेत. त्यात आम्ही हस्तक्षेप करणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं. यापूर्वी ८ मे रोजी मुंबई उच्च न्यायालयानं औरंगाबादचं नाव बदलून छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचं नाव बदलून धाराशिव करण्याचा राज्य सरकारचा निर्णय कायम ठेवला होता. हा निर्णय कायदेशीरदृष्ट्या योग्य असल्याचं उच्च न्यायालयानं म्हटलं होतं. आता सर्वोच्च न्यायालयानंही त्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे आता औरंगाबादचं ना छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचं नाव धाराशिव कायम राहणार आहे.

### नाव देण्यासोबतच, नाव बदलण्याचेही अधिकार राज्य सरकारकडे : सर्वोच्च न्यायालय

सूचना आणि हरकती मागवण्याची एक प्रक्रिया कायद्यामध्ये आहे. त्यामुळे त्याअंतर्गत धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांची नावं बदलण्याची प्रोसेस झालेली नाही, असा याचिकाकर्त्यांनी युक्तीवाद केला. त्यावर बोलताना सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं की, कायद्यांतर्गत अधिकार सरकारला आहेत. ज्याप्रमाणे नाव देण्याचे अधिकार सरकारकडे आहेत, त्याचप्रमाणे नाव बदलण्याचेही अधिकार आहेत.

- महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशचा कायदा वेगळा.... (पान २ वर)

# कडोंमपातील खंडणीखोर कामगार विनोद लकेश्री निलंबित, आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची कठोर कारवाई



**कल्याण – विकासकाकडून रोख, सदनिकांच्या स्वरुपात खंडणी घेण्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झालेला कल्याण डोंबिवली पालिकेच्या घनकचरा विभागातील वाहनचालक कामगार विनोद मनोहर लकेश्री यांना शुक्रवारी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे यांनी दाखल केलेल्या प्रस्तावरून निलंबित केले.**

कामगार विनोद लकेश्री यांच्यावर विष्णुनगर पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाल्याने त्यांच्यावर आयुक्तांनी महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त नियमाने निलंबनाची कारवाई केली आहे. निलंबन काळात त्यांची उपस्थिती पालिका मुख्यालयात राहील.

– **वंदना गुळवे**, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग.

महाराष्ट्र नागरी सेवा व शिस्त नियम १९७९ मधील नियम ४(१) प्रमाणे प्रशासनाने कामगार लकेश्री यांच्यावर ही कारवाई केली. पालिकेतून निलंबित होण्याची त्यांची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाच्या आवारात माघी गणेशोत्सवानिमित्त आयोजित एका सांस्कृतिक कार्यक्रम जाहीरपणे बक्षिसरुपाने पैसे उधळल्याने अनेक कर्मचारी निलंबित झाले होते. त्यामध्ये विनोद यांचाही सहभाग होता. ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागानेही त्यांची चार वर्षांपूर्वी चौकशी केली होती. काही महिन्यांपूर्वी त्यांच्यावर पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयासमोर भूमाफियांकडून जीवघेणा हल्ला झाला होता. त्यातून ते सुदैवाने बचावले होते. डोंबिवलीतील बेकायदा बांधकामांशी त्यांचे नाव नेहमीच जोडले जात होते.

या हल्ल्यानंतर अलीकडे लकेश्री यांनी पोलीस आयुक्तांकडे आपल्या जीवाला काही जणांकडून धोका असल्याची, तसेच एक वाहन आपले नियमित पाठलाग करते अशी तक्रार केली होती. त्या अनुषंगाने ठाणे पोलिसांनी चौकशी सुरू केली होती. या तपास प्रक्रियेतून हा खंडणीचा प्रकार उघडकीला आला आहे.

विकासक प्रफुल्ल गोरे यांनी डोंबिवलीत विविध भागात सुरू असलेल्या आपल्या गृहप्रकल्पांच्या तक्रारी कामगार विनोद लकेश्री यांच्यासह वसंत शंभरकर, प्रशांत शिंदे, माहिती कार्यकर्ते महेश निंबाळकर यांनी पालिका, शासनाकडे केल्या. आपल्या गृहप्रकल्पांची छायाचित्रे समाज माध्यमांमध्ये प्रसारित करून (पान २ वर)

# मराठा समाज आरक्षणासाठी पात्र

- ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा बंधनकारक नाही!
- मागासवर्ग आयोगाचे हायकोर्टात प्रतिज्ञापत्र

मराठा समाजाचे लोक आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. त्यांच्या दयनीय आर्थिक स्थितीवरून समाजातील अपवादात्मक मागासलेपण दिसून येते. त्यामुळे अपवादात्मक परिस्थितीत ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून मराठा समाजाला आरक्षण दिले जाऊ शकते. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा बंधनकारक नसून ते फक्त निर्देश आहेत, असे स्पष्ट करीत मागासवर्ग आयोगाने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. यावर ५ ऑगस्टला महत्त्वपूर्ण सुनावणी होणार आहे.

मराठा समाजाला शिक्षण व नोकरीत दिलेल्या १० टक्के आरक्षणाच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देत विविध याचिका दाखल झाल्या आहेत. त्या सर्व याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या नेतृत्वाखालील पूर्णपीठासमोर सुनावणी सुरू आहे. मागील सुनावणीवेळी खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार मागासवर्ग आयोगाने आपले मास्टर प्रतिज्ञापत्र दाखल करून मराठा आरक्षणाचे समर्थन केले आहे. मागासवर्ग आयोगाच्या सचिव आशाराणी पाटील यांनी हे प्रतिज्ञापत्र दाखल करताना सर्वेक्षणात आढळलेल्या मराठा समाजाच्या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकला आहे. या प्रतिज्ञापत्राच्या अनुषंगाने न्यायालय



कोणती भूमिका घेतेय, याकडे मराठा समाजासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# शेतकऱ्यांच्या वीजबिल माफी संदर्भात जीआर निघाला

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा



**नागपूर – शेतकऱ्यांच्या वीज बिल माफी संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. शेतकऱ्यांच्या वीज बिल माफीचा जीआर राज्य सरकारने काढलेला आहे. पुढील पाच वर्ष शेतकऱ्यांना विजेचे बिल भरण्याची गरज नसल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले आहे. आगामी वर्षानंतर राज्यात आमचेच सरकार पुन्हा येणार आहे. तेव्हा आम्ही पुन्हा वीज बिल माफ करू. असा विश्वासह फडणवीसांनी यावेळी बोलून दाखवला आहे. आज उपराजधानी नागपूर येथे पार पडलेल्या डीपीडीसीच्या बैठकीनंतर देवेंद्र फडणवीस प्रसारमाध्यमांशी बोलत होते. तेव्हा त्यांनी ही माहिती दिली आहे.**

### नागपूर जिल्ह्याच्या विकासासाठी ५ हजार कोटी रुपयांचा निधी

नागपूरच्या नियोजन आराखड्यात मोठा निधी देऊन अजून मोठी वाढ आपण केली आहे. विविध कामांसाठी नागपूर जिल्ह्यात महाराष्ट्र सरकारने ५ हजार कोटी रुपये दिले आहेत. सोबतच काही चांगल्या सूचनाही या बैठकीतून पुढे आल्या आहेत. सोबतच संरक्षित वन क्षेत्राच्या अवतीभवती असलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सोलर फॅन्सीग जिल्हा विकास निधीतून करण्याचा आमच्या प्रयत्न आहे. सोबत पांदन रस्त्यांसाठी खास निधी राखीव ठेवला असल्याची माहितीही देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### भाजपमधील राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा खुलासा

राज्याच्या राजकारणात भाजपमधील राष्ट्रीय अध्यक्ष पदाला घेऊन अनेक नावांची चर्चा आहे. यात देवेंद्र फडणवीस यांचे देखील नाव असल्याचे पुढे आले आहे. या विषयी भाष्य करत या संदर्भात अखेरीस फडणवीस यांनीच स्वतः खुलासा केलाय. ही चर्चा फक्त माध्यमानी सुरू केली आहे आणि ही चर्चा फक्त माध्यमामध्येच सुरू असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.


### विकासकामे अधिक वेगाने करण्याचा आमचा प्रयत्न

नागपूर शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहे. येणाऱ्या काळात ते अधिक वेगाने करण्याचा आमचा प्रयत्न आहे, आणि आम्हाला याची देखील कल्पना आहे की या विकासकामांमुळे नागरिकांना काहीप्रमाणात त्रास देखील होत आहे. मात्र आपल्या घरी सुद्धा आपण काही काम काढलं तर काही त्रास सहन करावा लागतोच. सुरू असलेले विकासकाम वेगाने करण्याचा आमचा प्रयत्न आहे आणि रस्त्यांवरील खड्डे तात्काळ बुजवले पाहिजे, अशी सूचना आम्ही संबंधित विभागाला दिल्या असल्याचेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.



# एशियन कंपनीचा कलर वाहतूक करणारा ट्रक उलटला





ठाणे - ठाण्याच्या घोडबंदर रोडवरील पातलीपाडा ब्रिजजवळ एशियन पेंट कंपनीचे कलरचे डब्बे घेऊन बडोद्याला निघालेल्या ट्रकला पातलीपाडा ब्रिजजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात घडला. ट्रक उलटला आणि संपूर्ण रस्त्यावर कलर पसरला. हजारो लिटर कलर रस्त्यावर पसरला. रस्त्यावर कलर पसरल्याने वाहतूक काहीकाळ ठप्प झाली. यामुळे पातलीपाडा ते मानपाडा पर्यंत वाहनाच्या रांगा लागल्याची परिस्थिती शुक्रवारी सकाळीच उद्भवली.

खंडाळ्यावरून २६ टन एशियन पेंट कलरचे डब्बे घेऊन जाणारा ट्रक उलटल्याची घटना शुक्रवारी(ता-२ ऑगस्ट) रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास पातलीपाडा ब्रिजजवळ घडली. सकाळच्या सुमारास ही घटना घडल्याने त्याचा वाहतुकीवर चांगलाच परिणाम झाला. पातलीपाडापासून मानपाडयापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहण्यास मिळाल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी तो ट्रक रस्त्याच्या एका बाजूला काढेपर्यंत वाहतूक ठप्प झाली होती. अपघातग्रस्त ट्रक क्रेनद्वारे बाजूला केल्यानंतर तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

### ■ पातलीपाडापासून मानपाडयापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा

ऑर्डरनुसार सदरचा माल हा ठाणेमार्गे बडोद्याला घेऊन चालक निलेश म्हस्के निघाला होता. ट्रक पातलीपाडा ब्रिज ब्रह्माण्ड सिग्नलजवळ आल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रक उलटला. आणि एशियन पेंट कंपनीच्या हजारो लिटरचा पंधरा चांगल्या दर्जाचा कलरचे नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी वाहतूक पोलीस, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तातडीने आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, वाहतूक पोलीस कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मार्फत ०२-हायड्रा मशीनच्या मदतीने रोडवरती पलटी झालेल्या ट्रक रोडच्या एका बाजूला केला. दरम्यान घोडबंदरकडे जाणाऱ्या रोडवरती अपघात झाल्यामुळे पातलीपाडा ब्रिजच्या खालून जाणारा रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात होता. तर पातलीपाडा ब्रिजवरून घोडबंदरच्या दिशेने जाणारी वाहतूक धिम्या गतीने सुरू आहे. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

# ठाणे शहरातील रिक्षा चालकांचा संपाचा इशारा

**दंड स्वरुपात आकारण्यात येणारी रक्कम कमी करण्याची मागणी...**

**ठाणे : शहरात ज्यादा प्रवासी वाहतूक करणाऱ्या तसेच बेशिस्तपणे रिक्षा चालवणाऱ्या रिक्षा चालकांवर गेल्या काही दिवसांपासून वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. या रिक्षा चालकांकडून १५०० रुपये दंड आकारला जात आहे. दररोज मिळत असलेल्या उत्पन्नातून आर्धी रक्कम दंडाला जात असल्यामुळे अनेक रिक्षा चालक त्रासले आहेत. दंड स्वरुपात आकारण्यात येणारी रक्कम पूर्वी सारखी कमी करण्याची मागणी त्यांच्याकडून जोर धरु लागली आहे. जर मागणी पूर्ण झाली नाही तर, ५ ऑगस्ट पासून बेमुदत रिक्षा बंद ठेऊ असा इशारा रिक्षा चालकांनी दिला आहे. रिक्षा चालकांच्या या संपाला रिक्षा संघटनेचा मात्र विरोध असल्याचे पाहायला मिळत आहे.**

ठाणे : शहरात ज्यादा प्रवासी वाहतूक करणाऱ्या तसेच बेशिस्तपणे रिक्षा चालवणाऱ्या रिक्षा चालकांवर गेल्या काही दिवसांपासून वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. या रिक्षा चालकांकडून १५०० रुपये दंड आकारला जात आहे. दररोज मिळत असलेल्या उत्पन्नातून आर्धी रक्कम दंडाला जात असल्यामुळे अनेक रिक्षा चालक त्रासले आहेत. दंड स्वरुपात आकारण्यात येणारी रक्कम पूर्वी सारखी कमी करण्याची मागणी त्यांच्याकडून जोर धरु लागली आहे. जर मागणी पूर्ण झाली नाही तर, ५ ऑगस्ट पासून बेमुदत रिक्षा बंद ठेऊ असा इशारा रिक्षा चालकांनी दिला आहे. रिक्षा चालकांच्या या संपाला रिक्षा संघटनेचा मात्र विरोध असल्याचे पाहायला मिळत आहे.

ठाणे शहरातील वागळे इस्टेट, अंबिकानगर, ज्ञानेश्वरनगर, महात्मा फुलेनगर त्याचबरोबर शिवाईनगर, वसंत विहार, पवारनगर, घोडबंदर भागातूनही अनेक नागरिक ठाणे स्थानकापर्यंत प्रवास करतात. या सर्वच भागातील प्रवाशांची संख्या मोठी आहे. तसेच ठाणे स्थानकापासून या परिसराचे अंतर देखील जास्त आहे. यासाठी ठाणे शहरात सार्वजनिक वाहतूकीसाठी टीएमटीच्या बसगाड्यांची सुविधा उपलब्ध आहे. परंतु, या बसगाड्या पुरेशा प्रमाणात नाही. तसेच मीटर रिक्षाने प्रवास करणे नागरिकांना परवडत नाही. त्यामुळे अनेकजण शेअर रिक्षाने प्रवास करण्यास प्राधान्य देतात. स्थानक परिसरातील गावदेवी मंदिर परिसर, गावदेवी मैदान परिसर, सिडको, मासुंदा तलाव परिसर अशा विविध भागात शेअर रिक्षा चालकांचे थांबे आहेत.

शेअर रिक्षा चालक ठाणे स्थानक परिसरापासून ते लोकमान्यनगर पर्यंत प्रति प्रवासी २० रुपये भाडे आकारतात. तर, सिडको ते बाळकूम पर्यंत प्रति प्रवासी २५ रुपये भाडे आकारले जाते. ठाणे स्थानक ते लोकमान्यनगर पर्यंत मीटर प्रमाणे रिक्षा प्रवास केल्यास ६५ ते ७० रुपये भाडे दर होते. तर, सिडको ते बाळकूम पर्यंत मीटर प्रमाणे रिक्षा प्रवास केल्यास ८० रुपये भाडे दर होते. केवळ तीन प्रवासी घेऊन वाहतूक करणे शेअर रिक्षा चालकांना परवडत नाही. त्यामुळे अनेक शेअर रिक्षा चालक बेकायदेशिररित्या चार प्रवासी घेऊन वाहतूक करताना दिसून येतात. या रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई वाहतूक पोलिसांकडून केली जाते. त्यामुळे दररोज उत्पन्नातील अर्धी रक्कम दंडासाठीच जात असल्यामुळे आम्हाला ते परवडत नसल्याचे काही रिक्षा चालकांकडून सांगण्यात आले.

> रिक्षा चालकांच्या मागण्यांसदर्भात वेळोवेळी संघटनेच्या माध्यमातून पत्रव्यवहार केला जातो. दंडात्मक कारवाईवरुन ज्या शेअरिंग रिक्षा चालकांनी संप पुकारला आहे. त्या संपाला रिक्षा संघटनेने समर्थन दिलेले नाही. ज्यादा प्रवासी वाहतूक आणि बेशिस्तपणे रिक्षा चालकांवर कारवाई करणे हे वाहतूक विभागाचे काम आहे. त्यामुळे आम्ही चुकीच्या गोष्टींना समर्थन देत नसून ज्या रिक्षा चालकांनी हा संप पुकारला आहे त्यांची समजूत काढण्याचा आम्ही प्रयत्न करु.
>
> – विनायक सुर्वे, अध्यक्ष,एकता रिक्षा टॅक्सी चालक मालक संघटना

# घाटकोपरनंतर आता कल्याणमध्ये कोसळले महाकाय होर्डिंग

**कल्याण – मुंबईतल्या घाटकोपरमधील पेट्रोलपंपवर १६ मे रोजी होर्डिंग पडल्याची घटना समोर आली होती. हे होर्डिंग १२० बाय १२० फूट इतके होते. या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला होता तर ७५ जण जखमी झाले होते. या प्रकरणानंतर मुंबई शहरातील मोठमोठे होर्डिंग पाडण्यात आले, बेकायदेशीर होर्डिंग्सवर कारवाई करण्यात आली. पण अजूनही भलेमोठे होर्डिंग उतरले नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे नागरिकांचा जीव अजूनही टांगणीला आहे. घाटकोपरनंतर आता कल्याणमध्ये होर्डिंग कोसळण्याची मोठी दुर्घटना समोर आली आहे.**

कल्याण सदानंद चौकात भला मोठा होल्डिंग पडला आहे. याचे सीसीटीव्ही फुटेज झी २४ तासच्या हाती लागले आहे. या चौकात नेहमी लोकांची मोठ्या प्रमाणात रहदारी असते. तसेच गाड्यादेखील मोठ्या संख्येने असतात. या पडलेल्या होर्डिंगखाली दहा ते बारा दुचाकी आहेत. तसेच एक चारचाकी गाडीदेखील आहे. सुदैवाने चारचाकीतील चालक होर्डिंग पडण्याच्या काहीवेळ आधीच गाडीतून बाहेर पडला होता. गाडीवर होल्डिंग पडल्याने कारचे नुकसान झाले आहे. तसेच रस्त्यावरचं होर्डिंग पडल्याने रस्त्यात ट्रॅफीक झाले आहे. या घटनेमध्ये दोन नागरिक जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

मुंबईप्रमाणे कल्याणमधील होर्डिंगदेखील अधिकृत आहेत की अनधिकृत आहेत? हे सांगता येणं कठीण आहे. पण यात सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे.

(अधिक वृत्त पान ४ वर)

### होर्डिंगला परवाना होता तरी..

या होर्डिंगला परवाना मिळाला होता पण आता अशी दुर्घटना का झाली? याचा तपास केला जाईल. यात किती गाड्यांचे नुकसान झाले याचा पंचनामा करण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

### कॉन्ट्रॅक्टरकडून नुकसान भरपाई घेणार

कॉन्ट्रॅक्टरने बॅनर लावताना योग्य एसओपीचे पालन केले नाही. त्यामुळे आम्ही त्यांच्यावर योग्य ती कारवाई करतोय, असे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.नुकसान भरपाई कॉन्ट्रॅक्टरमार्फत दिली जाईल हे पाहून. यात कॉन्ट्रॅक्टरचा निष्काळजीपणा दिसत असून त्याप्रमाणे त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. तसेच विभागताली संबंधित प्रश्न लवकरच मार्गी लावले जातील अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## न्यायालयाचे मौन

निवडणूक रोखे व्यवहार प्रकरणावरून भारतीय जनता पार्टीवर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. त्यानंतर विरोधक या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी करत होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भातील याचिका स्वीकारलेली नाही. निवडणूक रोखे प्रकरणावरून सत्ताधाऱ्यांनी देणग्यांच्या बदल्यात कंपन्यांना लाभ दिल्याचा आरोप होत होता. त्यामुळे हे प्रकरण चर्चेत होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने १५ फेब्रुवारी रोजी निवडणूक रोखे योजना रद्द केली होती. कारण याद्वारे राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्या, त्यातून होणाऱ्या पैशांच्या देवाणघेवाणीवर लक्ष ठेवता येत नव्हते. परंतु सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भातील याचिका फेटाळल्याने सत्ताधारी भाजपाची अब्रू वाचली आहे असे दिसते. तसेच या योजनेतून भाजपालाच नव्हे तर इतर काही पक्षांना निधी मिळाल्याचा मुद्दा उपस्थित करत न्यायालयाने याचिका फेटाळली आहे.सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने निवडणूक रोखे व्यवहारासंदर्भातील याचिका फेटाळली आहे. सरन्यायाधीशांनी याप्रकरणी सुनावणी करण्यासही नकार दिला. कॉमन कॉज व सेंटर फॉर पब्लिक लिटिगेशन या संस्थांनी याप्रकरणी याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांमध्ये म्हटले होते, निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून राजकीय देणग्या देऊन कथित लाच दिल्याचाच हा प्रकार आहे. या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाला आहे. याप्रकरणी सीबीआय किंवा इतर कुठली राष्ट्रीय तपास यंत्रणा तपास करत नसल्यामुळे एसआयटीमार्फत चौकशी तपास केला जावा, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती. परंतु सर्वोचच न्यायालयाने या मागणीचा विचारच केलेला दिसत नाही. या याचिका फेटाळत सरन्यायाधीश म्हणाले, या कथित घोटाळ्याच्या तपासाची कोणतीही आवश्यकता नाही. ज्याला कोणाला या प्रकरणात काही संशय असतील तर त्यांनी कायदेशीर मार्ग स्वीकारावा. तक्रारदाराचे त्यानंतरही समाधान झाले नाही तर ते न्यायालयाचे दार ठोठावू शकतात. परंतु, सध्या तरी याप्रकरणी एसआयटी तपासाची आवश्यकता नाही. आमच्या (सर्वोच्च न्यायालय) मागील आदेशानंतर निवडणूक रोख्यांबाबतची सर्व प्रकारची माहिती सार्वजनिक करण्यात आली आहे. त्यामधून आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली की, सरकारकडून लाभ मिळवण्यासाठी काही कंपन्यांनी राजकीय पक्षांना निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून देणग्या दिल्याचे उघड झाले आहे. सर्वोच्च न्यायालय हे मान्य करते की, निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून राजकीय पक्षांना देणग्या दिल्या गेल्या. यातील बऱ्याचशा कंपन्यांवर यापूर्वी राष्ट्रीय तपास यंत्रणांकडून अनियमतेप्रकरणी कारवाई करण्यात आली होती. बहुदा त्या कंपन्यांनी सत्ताधारी राजकीय पक्षाला देणग्या दिल्या असे आढळून आले. हा एक प्रकारचा भ्रष्टाचार आहे असे दिसते. परंतु यंत्रणा याकडे डोळेझाक करीत आहे असे वाटते.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनंतर निवडणूक आयोगाने व भारतीय स्टेट बँकेने निवडणूक रोख्यांबाबतचा तपशील जाहीर केला होता. त्यानुसार, १ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ या काळात तब्बल २२ हजार २१७ कोटींचे निवडणूक रोखे राजकीय पक्षांच्या नावे जारी करण्यात आले. त्यापैकी ८ हजार ६३३ कोटींचे रोखे एकट्या भाजपाच्या नावावर आहेत, तर तृणमूल काँग्रेस दुसऱ्या व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष तिसऱ्या स्थानावर आहेत. असे जरी असले तरी सत्ताधारी पक्षाकडे या प्रकरणातील घोटाळ्याची जबाबदारी जात आहे. ही योजना विशिष्ट हेतूने सत्ताधारी प्रकाशाने सुरू केली. सत्ताधारी पक्षाच्या हातात देशातील सर्वोच्च अधिकार असताना संबंधित कंपन्यांवर हेतुपुरस्सर कारवाई करण्याची भीती दाखवत कंपन्यांना राजकीय पक्षांना देणगी देण्यास बाध्य केले, असा अर्थ सरकारच्या काही कृतींतून ध्वनित होतो. यामुळे सर्वोच्च न्यायालय हे प्रकरण केव्हाच मिटले हे सांगत त्यावर झाकण बसवत आहे, असे वाटते.

# कैलासनगर मराठी शाळा क्रं १ आणि तमिळ शाळा क्रं. ११ च्या नवीन इमारतीच्या कामाचे भूमिपूजन

## ...अखेर माजी उपनगराध्यक्ष अब्दुलभाई शेख यांच्या अथक पाठपुरावा मिळाले यश





अंबरनाथ (प्रतिनिधी)- अंबरनाथ नगरपरिषदेच्या हद्दीतील असणाऱ्या कैलासनगर येथील मराठी शाळा क्रमांक १ आणि स्वामीनगर शास्त्रीनगर येथील तमिळ शाळा ११ या दोन्ही शाळेची अतिशय बिकट परिस्थिती होऊन शाळेची दुरवस्था झाली होती, या शाळेच्या छतावरील कौले तुटल्याने पावसाचे पाणी शाळेतील विद्यार्थ्यांच्या अंगावर पडायचे आणि त्याचच विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यायला लागायचे. तर शाळेच्या भिंतींना तडे, शौचालयाची दुरवस्था अशा विविध त्रासाला विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत होते, ही बाब अंबरनाथ नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष अब्दुलभाई शेख यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अंबरनाथ नगरपालिका प्रशासनासह शासन स्तरावर पाठपुरावा करण्यास सुरुवात केली, गेल्या १० वर्षांच्या पाठपुराव्यानंतर कल्याण लोकसभेचे खा. श्रीकांत शिंदे व आ. डॉ. बालाजी किणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण अनुदानातुन ९ कोटी रुपयांचा निधीतुन कैलासनगर येथील मराठी शाळा क्रमांक १ आणि स्वामीनगर शास्त्रीनगर येथील तमिळ शाळा ११ या दोन्ही शाळेच्या नवीन इमारतीच्या कामाला मंजुरी मिळाली आणि माजी उपनगराध्यक्ष अब्दुलभाई शेख यांच्या अथक पाठपुराव्याला अखेर यश मिळाले.

शाळेच्या इमारतीच्या कामाचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता, माजी उपनगराध्यक्ष अब्दुलभाई शेख यांच्यासह शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, स्थानिक नागरिक व पत्रकारांच्या हस्ते श्रीफळ फोडून इमारतीच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले, जी प्लस वन अशी इमारत शाळेच्या पाठीमागील बाजूस असणाऱ्या जागेत सर्व मूलभूत सोयी सुविधा असलेली सुसज्ज अशी इमारत उभारण्यात येणार असून सद्या जुनी शाळा आहे त्याठिकाणी सुसज्ज असे खेळाचे मैदान देखील तयार करण्यात येणार असल्याचे अब्दुलभाई शेख यांनी सांगितले.

याप्रसंगी बांधकाम विभागाचे राजेश तडवी, युवासेनेचे महेश चव्हाण, रोहित चलवादी यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी, शिक्षक व स्थानिक नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### मनू भाकर पुन्हा एकदा फायनलमध्ये

**(पान १ वरून)** यानंतर सरबज्योत सिंह याच्यासह मिश्र दुहेरीत मनू भाकरनं कांस्य पदक जिंकलं होतं. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदकं मिळवणारी मनू भाकर स्वातंत्र्यानंतरची पहिली खेळाडू ठरली आहे.

### कडोंमपातील खंडणीखोर कामगार विनोद लकेश्री निलंबित, आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांची कठोर कारवाई

**(पान १ वरून)** आपली आपल्या गृहप्रकल्पांमध्ये घर खरेदी होणार नाही अशा पद्धतीने आपली कोंडी केली. या तक्रारी मागे घेण्याच्या माध्यमातून आरोपींनी आपल्याकडे रोख ४१ लाख रुपये आणि पाच सदनिका खंडणीरुपाने घेतल्या आहेत, अशी तक्रार ठाणे खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांच्याकडे केली होती.

या प्रकरणाचा तपास सुरू होताच, लकेश्री आणि इतर दोन जण फरार झाले. गेल्या वीस दिवसांपासून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. सकृतदर्शनी सबळ पुरावे असल्याने पोलिसांनी लकेश्री यांच्यासह इतर आरोपींवर विष्णुनगर पोलीस ठाण्यात मंगळवारी खंडणीचा गुन्हा दाखल केला. या खंडणी प्रकारात पालिका कर्मचारी सहभागी असल्याने पालिकेच्या प्रतीमेला धक्का आणि पालिकेची बदनामी झाल्याने आयुक्त डॉ. जाखड यांनी सामान्य प्रशासन उपायुक्त गुळवे यांना लकेश्री यांना तातडीने सेवेतून निलंबित करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाप्रमाणे शुक्रवारी लकेश्री यांना पालिका सेवेतून निलंबित करण्यात आले. ही कारवाई म्हणजे अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला हटाव पथक, घनकचरा विभागातील कामगारांना मोठा इशारा आहे.

### संभाजीनगर, धाराशिव नामांतरप्रकरणी हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**(पान १ वरून) महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशचा कायदा वेगळा, ही प्रकरणं सारखी नाहीत : सर्वोच्च न्यायालय–** उच्च न्यायालयानं नामांतर प्रकरणाच्या याचिकेत हस्तक्षेपास नकार दिला होता. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करताना याचिकाकर्त्यांनी अलहाबाद आणि प्रयागराजच्या प्रकरणांचा दाखला दिला होता. या दोन्ही प्रकरणांची याचिका याच कोर्टात प्रलंबित असल्याचा युक्तीवाद याचिकाकर्त्यांच्या वतीनं करण्यात आला. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं की, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशचा कायदा वेगळा आहे. त्यामुळे ही प्रकरणं सारखी आहेत, असं म्हणता येणार नाही.

**नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम**
बेलापूर भवन, ८ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४

**प्रशासन विभाग**
**फेर ई-निविदा सुचना**

**निविदा क्र.** नमुंमपा/परि/व्यव/प्रशा/०३/२०२४-२५
**विषय : नमुंमपा परिवहन उपक्रमातील कंत्राटी कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना ग्रुप वैद्यकीय विमा योजना लागू करणेकरीता शासकीय विमा कंपन्यांकडून निविदा मागविण्यात येत आहे.**

सदर बाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार परिवहन व्यवस्थापक, नमुंमपा, परिवहन उपक्रम यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(योगेश कडुसकर)
**परिवहन व्यवस्थापक**
**नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम**

**जा.क्र. नमुंमपा/परि/प्रशा/७८४/२०२४**
**दि. ०२/०८/२०२४**

**नवी मुंबई महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**फेर-निविदा सुचना क्र.नमुंमपा / का.अ(वाशी)/ 8 /2024-25**

**कामाचे नाव :-** वाशी से.1ए येथील दैनदिन बाजार इमारतीची सुधारणा करणे.

**अंदाजपत्रकिय रक्कम रु. :- 21,16,427/-**

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.03/08/2024 रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**कार्यकारी अभियंता (वाशी)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/161/2024

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८
बांधकाम / विद्युत विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/साबां/निविदा/३६/२०२४-२५ दि. ०१/०८/२०२४

**// निविदा सुचना क्र. ३६ //**

भाईंदर (प.) येथील ३० मीटर रेल्वे समांतर रस्ता सेवालाल चौक ते मिरारोड कलवर्ट पर्यंत काँक्रीटीकरण करणे या कामी ज्या कंत्राटदारांविरूध्द शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरू आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र मिरा भोईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in वर दि. ०६/०८/२०२४ ते दि. १३/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि. १४/०८/२०२४ रोजी पर्यंत दु. १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. १६/०८/२०२४ रोजी दु. १२.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

जा. क्र. मनपा/मावज/E-२४८९२०७/२०२४-२५
दि. ०२/०८/२०२४
ठिकाण : भाईंदर
दिनांक : ०१/०८/२०२४

सही/-
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानरगपालिका

## बळीराम नईबागकर यांचे निधन



ठाणे : श्री साईनाथ सेवा समिति श्री साईबाबा मंदिर वर्तकनगर ठाणे संस्थापक अध्यक्ष बळीराम वासुदेव नईबागकर यांचे सोमवार दि. २९/०७/२४ रोजी निधन झाले. त्यानिमित्त शनिवार दि.०३/०८/२४ रोजी संध्याकाळी ६:०० वाजता शोकसभा श्री साईबाबा मंदिर सभागृह ठाणे, येथे आयोजित श्रद्धांजली सभा आयोजित केली आहे.

# अटलसेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवास मंदगतीने

पनवेल : राज्य सरकारने १७ हजार ८०० कोटी रुपये खर्च करुन २१ किलोमीटर अंतराचा समुद्रावर अटलसेतू बांधला परंतू अटलसेतूवरुन मुंबई पूणे या मार्गिकेवर प्रवास करणाऱ्या ५० हजार वाहनांना सध्या पनवेलमधील कोळखे गाव ते कोन गावापर्यंत मंदगतीने प्रवास करावा लागत आहे. यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) कोळखे ते कोन या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर उन्नत मार्ग बांधणार असून यासाठी सूमारे एक हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. ही मार्गिका बांधकामासाठी ३० महिन्यांचा कालावधी लागणार असून कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया पुर्ण झाली असली तरी या मार्गिकेचे काम कंत्राटदाराने सुरु केलेले नाही. त्यामुळे अजून अडीच वर्षे अटलसेतू ते पुणे प्रवास करणाऱ्यांना पनवेलमध्ये कोंडीचा सामना करावा लागणार.

सध्या पनवेलमधील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ म्हणजे कोळखे गाव ते कोन गावापर्यंतचा मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक हैराण झाले आहेत. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरुन पनवेलमध्ये येणारा मार्ग आणि द्रुतगती मार्गाला पनवेल शहराला जोडणाऱ्या मार्गावर दिवसाला सूमारे ५० हजार वाहने या मार्गावरुन धावतात. अटलसेतूवरुन मुंबईतून आलेली हलकी वाहने याच मार्गावरुन द्रुतगती मार्गाला जोडली जातात. रसायनी येथील औद्योगिक वसाहतीला व पुढे शेडूंग टोलनाक्याला जोडणारा हाच मार्ग असल्याने या मार्गावर वाहतूकीचा ताण वाढला आहे. पळस्पे फाट्यावरील कोळखे गावाजवळ बांधलेल्या पुलावर १२ मार्गिका आहेत. मात्र पळस्पे पुलावरुन या मार्गावर गाड्या उतरल्यानंतर तो मार्ग अवघ्या सहा मार्गिकांमध्ये बदल होत असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी सदैव अनुभवायला मिळते.

राज्य सरकारने समुद्रावर १६.५ किलोमीटर अंतरावर आणि जमिनीवर ५.५ किलोमीटर अंतरावर अटलसेतू बांधला. मात्र या महामार्गाला जोडणाऱ्या अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर कोळखे ते कोन गावापर्यंत मार्गिका न बांधल्यामुळे वाहतूक कोंडीच्या मोठ्या समस्येला ५० हजार वाहनचालक दररोज तोंड देत आहेत. याबाबत एमएमआरडीएच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर या पल्यावर १ हजार रुपये खर्च करुन उन्नत मार्ग बांधणार असल्याचे सांगितले. संबंधित मार्ग बांधण्यासाठी कंत्राटदार नेमला आहे. मात्र कंत्राटदाराचा काम पुर्ण करण्याचा कालावधी ३० महिन्यांच्या असल्याचे या अधिकाऱ्याने सांगीतातपुरत्या स्वरुपात कोंडी कशी कमी होईल. हा उन्नत मार्ग बांधण्यासाठी अजूनही ३० महिने लागतील. वाहनचालकांना कोंडीतून तात्पुरता दिलासा मिळण्यासाठी एमएमआरडीए व एमएसआरडीसीला पुढाकार घ्यावा लागेल. तात्पुरत्या स्वरुपात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील कोळखे ते कोन गावापर्यंत रस्ता सूमारे १५ फूट रुंद करणे गरजेचा आहे. या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. रस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्ता रुंदीकरण केल्यास काही महिने का होईना कोंडी कमी होईल. तसेच अवजड वाहने रस्त्यावर वळसा घेत असल्याने कोंडी होते. अवजड वाहनांना वळसा घेण्यासाठी या रस्त्यावर बंदी केल्यास काही प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होईल अशी वाहनचालकांची मागणी आहे. पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरिक्षक संजय पाटील यांनी कोंडी कमी होण्यासाठी उपाययोजना एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना सुचविल्या आहेत. मात्र अजूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नाही.

## २१ तृतीयपंथीयांवर गुन्हे दाखल

नवी मुंबई : रात्री-अपरात्री सेवा रस्ते व एपीएमसी ट्रक टर्मिनल येथे बीभत्स व अश्लील चाळे करून वाहनचालकांना आकर्षित करणाऱ्या २१ तृतीयपंथीयांवर कारवाई करण्यात आली आहे. नवी मुंबईत अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला तृतीयपंथीय उभे राहून अश्लील चाळे करीत वाहनचालकांना आकर्षिक करण्याचा प्रयत्न करत असतात. मात्र त्यांच्यावर फारशी कारवाई होत नसल्याने गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या संख्येत वाढ होत होती. अनेकदा एकट्या-दुकट्या व्यक्तीला लुटण्याचे प्रकार होतात, मात्र पोलीस ठाण्यात येण्याचे लोक टाळतात. रात्री उशिरा तर रस्त्याच्या मध्यापर्यंत तृतीयपंथी येत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मोठा अपघात होण्याचीही शक्यता आहे. ही परिस्थिती निदर्शनास आल्याने पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अशा लोकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.



## ठाणे काँग्रेसकडून अनुराग ठाकूर यांच्या विरोधात निषेध आंदोलन

ठाणे : समाजातील सर्व घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय व हक्क मिळावेत यासाठी जात निहाय जनगणना करणे गरजेचे आहे. काँग्रेस पक्ष व इंडिया आघाडीतील मित्र पक्ष जातनिहाय जनगणना करण्यास कट्टीबद्ध आहेत. परंतु भारतीय जनता पक्षाचा जातनिहाय जनगणनेला तीव्र विरोध आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत जात निहाय जनगणनेचा मुद्दा मांडल्याने चातुर्वर्ण्य व्यवस्थेतच्या विचारधारेतून आलेल्या भाजपाच्या अनुराग ठाकूरांनी ज्यांच्या जातीचा पत्ता नाही, ते जात निहाय जनगणेची मागणी करत आहेत असे वक्तव्य करून या देशातील बहुजन आणि मागासवर्गीयांचा अपमान केला याच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने ठाणे काँग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करून बहुजनांचा अपमान करणाऱ्या भारतीय जनता पक्षाचा तसेच जातीयवादी वक्तव्य करणाऱ्या अनुराग ठाकूर याचा जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी प्रदेश प्रतिनिधी जे. बी. यादव, सुखदेव घोलप भालचंद्र महाडिक, निशिकांत कोळी, रमेश इंदीसे, शितल अहेर, महिला अध्यक्ष स्मिता वैती,ठाणे काँग्रेस प्रवक्ते राहुल पिंगळे, सेवादल अध्यक्ष रवींद्र कोळी, मागासवर्गीय अध्यक्ष उमेश कांबळे, किसान सेल अध्यक्ष ऋषिकेश तायडे, पर्यावरण अध्यक्ष मनोज डाकवे, सांस्कृतिक विभाग अध्यक्ष स्वप्निल कोळी, ब्लॉक अध्यक्ष अंजनी सिंग, हिंदुराव गळवे, राजू शेट्टी, जावेद शेख, सुरेश भोईर ,आनंद सांगळे, ज्येष्ठ नेते महिंद्र म्हात्रे, सुरेश पाटील खेडे, शिरीष घरत, दयानंद एगडे, गोपाळ सावंत, प्रसाद पाटील,बाबू यादव, सुभाष ठोंबरे, मुन्ना राजोरिया, अमरनाथ गुप्ता, संजय घाग, संगीता कोटल, शेणू नायर प्रतिभा मेनन, अपर्णा सावंत, किशोर कांबळे, किरायात मुकादम, राज चव्हाण, सुमन वाघ, आशा म्हस्के, रवी डोळस आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुलै महिन्यातील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांनी सांघिक भावनेने चांगले काम केल्यामुळेच नवी मुंबई महानगरपालिकेचे नाव सर्वत्र उंचावलेले आहे असे सांगत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी अगदी सुरुवातीच्या काळापासून ज्या महापालिका कर्मचाऱ्यांनी जडणघडणीत आपले योगदान दिले असे अनुभवी कर्मचारी सेवानिवृत्त होणे हे एक प्रकारे संस्थेचे नुकसान आहे असे मत व्यक्त केले. तथापि प्रत्येकाच्या जीवनात विहित वयोमानानुसार सेवानिवृत्ती अटळ असल्याने त्यांनी केलेल्या कामाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या सेवानिवृत्ती सन्मान समारंभ हा निवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मनाला समाधान देणारा असून ही एक चांगली प्रथा नवी मुंबई



महानगरपालिकेत आहे असे ते म्हणाले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयोजित जुलै महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, क्रीडा विभागाच्या उपायुक्त श्रीम. अभिलाषा म्हात्रे - पाटील, सहा. आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण आणि अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जुलै महिन्यात सेवानिवृत्त होणारे बालरोग तज्ज्ञ डॉ. पंडीत जाधव, प्रशासकीय अधिकारी गणेश आघाव व श्रीम.उज्ज्वला पाटील, अधिक्षक / वसुली अधिकारी श्रीम. आशालता रासकर, सांख्यिकी अधिकारी श्री.विकास जाधव, सिस्टर इनचार्ज / नाईट सुपरवायझर श्रीम.मारीया रॉड्रीक्स, मिश्रक / औषध निर्माता प्रमोद पाटील, आरोग्य सहाय्यक माधव पाटील या सेवानिवृत होणाऱ्या तसेच कार्यकारी अभियंता विजय राऊत या स्वेच्छानिवृत्त होणाऱ्या आधिकारी, कर्मचारी यांचा याप्रसंगी सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रशासन विभागा उपायुक्त शरद पवार, महापालिका सचिव श्रीम.चित्रा बाविस्कर, सहा.आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, विधी अधिकारी अभय जाधव यांची समयोचित शुभेच्छापर भाषणे झाली. बाल रोग तज्ज्ञ डॉ. पंडीत जाधव आणि प्रशासकीय अधिकारी गणेश आघाव यांनी सत्कारमूर्तींच्या वतीने प्रतिनिधिक स्वरुपात सत्काराला उत्तर दिले.

## महिलेची आमिष दाखवून फसवणूक

डोंबिवली : डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा गोपीनाथ चौक भागात कलावती आई मंदिर परिसरात राहत असलेल्या एका ३९ वर्षाच्या महिलेला तुमचे मंत्रालयात नोकरी लावण्यासाठी भामट्याने घेतलेले पैसे परत मिळवून देतो. असे सांगून या महिलेशी लगट करून तिच्या बरोबर लग्न करण्याची तयारी दाखवून भांडुपमधील एका भामट्याने महिलेची चार लाख रूपयांची फसवणूक केली आहे. ही ३९ वर्षाची पीडित महिला नोकरी करते. विवाहासाठी तिने समाज माध्यमातील एका डिव्होर्सी मेट्रोमॉनी या संकेतस्थळावर मनपसंत वरासाठी नोंदणी केली होती. या महिलेची संकेतस्थळावरील माहिती वाचून मुंबईतील भांडुप भागात राहत असलेल्या अभिजीत प्रभाकर फोंडकर (४२) याने संपर्क साधला. आपण अविवाहित आहोत. लग्नासाठी अपेक्षित वधू पाहत आहोत, असे सांगितले.

## भरधाव गाडीने घेतला बळी


### विवा महाविद्यालयाच्या प्राध्यापिकेचा मृत्यू

वसई : भरधाव वेगाने जाणार्या फॉर्च्युनर गाडीने धडक दिल्याने विवा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापिका आत्मजा कासाट यांचा मृत्यू झाला. विरार पश्चिमेच्या गोकुळ टाऊनशीप येथे गुरूवारी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास हा अपघात घडला.गुरूवारी संध्याकाळी महाविद्यालय सुटल्यावर प्रा. आत्मजा कासाट (४५) या विरार पश्चिमेच्या गोकुळ टाऊनशीप येथील आपल्या राहत्या घरी पायी जात होत्या. संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास पाठीमागून भरधाव वेगाने येणार्या फॉर्च्युनर या आलिशान गाडीने त्यांना जोरदार धडक दिली.या धडकेत प्रा. आत्मजा या दुभाजकावर फेकल्या गेल्या आणि गंभीर जखमी झाल्या. त्यांना विरारच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना रात्री दहाच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. अर्नाळा सागरी पोलिसांनी चालक शुभम पाटील (२४) याला ताब्यात घेतले आहे. त्याने मद्यपान केल्याची माहिती स्थानिकांनी दिली. प्रा. आत्मजा कासाट या विवा कनिष्ठ महाविद्यालयात इंग्रजी विषय शिकवत होत्या. त्या सामाजिक क्षेत्रात सक्रीय होत्या. त्यांच्या पश्चात पती आणि दोन मुले असा परिवार आहे.

**दिव्यात सात मजली इमारतीच्या लिफ्टच्या ओपन स्पेसेजमध्ये पडून तीन वर्षीय दीक्षा रामनाथ सहानी मुलीचा मृत्यू**

## बिल्डरवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे : रोहिदास मुंडे

दिवा : दिव्यात मुंब्रा देवी कॉलनी सेंट मेरी स्कूलच्या पाठीमागे सात मजली इमारतीचे काम चालू



होते. या बिल्डिंगला लिफ्ट साठी मोकळी जागा ही सोडण्यात आली होती. परंतु दिव्यात अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे की, बिल्डर हे लोकांकडून रूम विकल्यानंतर लिफ्ट साठी पैसे घेतात परंतु ती लिफ्ट वर्षोनुवर्षे बांधली जात नाही. त्यामुळे हे लिफ्टचे ओपन पॅसेज असेच उघडे असून दिव्या या संदर्भात अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. काल अशाच एका ओपन पेस मध्ये कोणतेही सुरक्षेचा नियोजन बिल्डराने केले नसून त्या डग मध्ये पाणी साचले होते व त्याच बिल्डिंगमध्ये राहणारी दीक्षा रामनाथ सहानी तीन वर्षीय मुलीचा त्यात पडून दुर्दैव मृत्यू झालेला आहे. तरी अशा बेजबाबदार बिल्डरांवर तात्काळ मनुष्यवादाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी मागणी केलेली आहे जर बिल्डर वर गुन्हा दाखल झाला नाही तर दिव्यातून मोठे आंदोलन उभं करू असे मुंडे यांनी म्हटले आहे व सदर परिवाराला तात्काळ बिल्डरने दहा लाखाची मदत करावी अशी मागणी रोहिदास मुंडे यांनी केली आहे.

# दिवा रेल्वे उड्डाणपूल उभारणीचा मार्ग मोकळा

ठाणे : दिवा पुर्व आणि पश्चिम भागांना जोडणाऱ्या रेल्वे उड्डाण पुल उभारणीच्या कामामध्ये बहुमजली इमारती, उच्च दाब विद्युतवाहिन्या आणि भुसंपादनचा अडथळा निर्माण झाल्याने काम रखडले आहे. यामुळे पालिका प्रशासनाने पुलाच्या कामाचा आरखड्यात काही बदल करत सुधारित आराखडा तयार केला असून या आखड्यास प्रशासकीय सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्याने दिवा रेल्वे उड्डाण पुल उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मध्य रेल्वेच्या दिवा रेल्वे स्थानकात रेल्वे उड्डाण पुल नसल्यामुळे नागरिकांना रेल्वे रुळ ओलांडतात. यामुळे रेल्वे अपघातात नागरिकांना प्राण गमवावे लागतात. असे अपघात टाळण्यासाठी ठाणे महापालिका आणि रेल्वे विभागाने रेल्वे उड्डाण पुल उभारणीचा निर्णय काही वर्षांपुर्वी घेतला होता. या प्रकल्पाच्या प्रस्तावस २०१८ मध्ये सर्वसाधरण सभेने मान्यता दिली होती. त्यानंतर २०१९ मध्ये निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर प्रत्यक्ष या कामाला सुरवात झाली. या पुलाच्या रेल्वेच्या हद्दीतील बांधकाम रेल्वेकडून तर, महापालिकेच्या हद्दीतील रस्त्याचे बांधकाम ठाणे महापालिकेकडून करण्यात येत आहेत. परंतु या उड्डाणपुलाच्या मार्गात बहुमजली इमारती, उच्च दाब विद्युतवाहिन्या आणि भुसंपादनचा अडथळा निर्माण झाला असून यामुळे गेल्या काही वर्षांपासून पुलाच्या उभारणीचे काम रखडले आहे.

पुलाच्या कामास होणारा विलंब लक्षात घेऊन ठाणे महापालिका प्रशासनाने पुलाचा आराखडा बदलण्याचा निर्णय काही महिन्यांपुर्वी घेतला होता. यानुसार पालिकेने सुधारीत आराखडा तयार केला असून या आराखड्यामुळे प्रकल्प खर्चात ३.७७ कोटींची बचत होणार असल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला आहे.

### असा आहे सुधारीत आराखडा

रेल्वे रुळावरील पुलाच्या भागात रेल्वेने दोन्ही बाजूस प्रत्येकी १.५० मीटर रुंदीचा पदपथ ठेवला आहे. त्यामुळे रेल्वे हद्दीबाहेरील जोडरस्त्यावरील पुलावर सुध्दा २.५० मीटर रुंदी ऐवजी १.५० मीटर रुंदीचा पदपथ सुधारीत आराखड्यात ठेवण्यात आला आहे. पश्चिम बाजूस रस्त्याची विकास आराखड्यानुसार रुंदी २० मीटर इतकी आहे. त्यामुळे पुलाच्या जोडरस्त्याची रुंदी १४.५० मीटर ऐवजी ८.५० मीटर करणे आवश्यक आहे. तसेच पश्चिम बाजूस विकास आराखड्यानुसार रस्त्याची पुरेशी रुंदी नसल्याने पुलावर पदपथ करण्याऐवजी केवळ वाहनांकरीता पुल बांधणे संयुक्तीक होणार आहे. त्यामुळे पुलाच्या दोन्ही बाजूस जमीन पातळीवर प्रत्येकी ४.५० मीटर रुंदीप्रमाणे जोड रस्ता उपलब्ध होणार आहे.

तसेच नागरिकांच्या विरोध लक्षात घेऊन पश्चिम बाजूकडील बहुमजली इमारत आणि गावदेवी मंदीर भागातील रस्त्याच्या आरेखनामध्ये बदल करण्यात येणार आहे. पूर्व बाजूकडील जोडरस्त्याची रुंदी १४.५० मीटर ऐवजी १२.५० मीटर केल्याने तसेच जोडरस्त्याच्या रॅम्प या भागातील पदपथ कमी केल्याने पुलाचे दोन्ही बाजूस जोड रस्त्याची रुंदी जास्त उपलब्ध होणार आहे, असे बदल सुधारीत आराखड्यात करण्यात आले आहेत.

# स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत नवी मुंबईतील शाळा-शाळांमध्ये झळकले विद्यार्थ्यांनी बनविलेले स्वच्छता आकाशकंदील

नवी मुंबई : 'स्वच्छ सर्वेक्षण २०२३' अंतर्गत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियान नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उत्साहाने राबविले जात असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार त्यामध्ये लोकसहभागावर भर दिला जात आहे. यात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणाऱ्या उपक्रमांवर विशेष लक्ष दिले जात असून या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कारक्षम वयातच स्वच्छतेचे महत्व बिंबविले जात आहे.


अशाच प्रकारचा विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला चालना देणारा व त्यांच्या निर्मिती क्षमतेला वाव देणारा कागदी स्वच्छता आकाशकंदील निर्मितीचा अभिनव उपक्रम आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून व अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सहयोगाने महापालिका शिक्षण विभागाच्या वतीने नवी मुंबईतील विविध शाळांमध्ये राबविण्यात आला.


त्यामध्ये महापालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या ८० शाळा तसेच इतर खाजगी शाळांनीही उत्साही सहभाग घेतला. महापालिकेच्या शाळांतील ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी २९७ स्वच्छता आकाश कंदीलांची निर्मिती केली असून इतर दोनशेहून अधिक खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांनी दीड हजारहून अधिक स्वच्छता आकाश कंदील बनविले आहेत. या आकाश कंदीलांवर 'द्या प्लास्टिकला नकार' अर्थात "Say No to Plastic' तसेच स्वच्छतेचे व पर्यावरण विषयक संदेश प्रदर्शित करण्यात आलेले आहेत.

आकाश कंदीलासारख्या सर्वांना आकर्षून घेणाऱ्या वस्तुची आपल्या हातून निर्मिती करण्याकरिता सर्व विद्यार्थ्यांमध्ये आनंद व उत्साह दिसून येत होता. त्यामुळे आकाश कंदील बनविताना विद्यार्थी समरसून गेल्याचे चित्र पहायला मिळाले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वछता, प्लास्टिक प्रतिबंध व पर्यावरण विषयक प्रभावीरित्या जाणीव जागृती झाली.

विद्यार्थ्यांइतकेच या उपक्रमामध्ये शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मार्गदर्शक म्हणून उत्साहाने सहभागी झाले होते. शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, शिक्षणाधिकारी श्रीम. अरूणा यादव यांनी विविध शाळांना भेटी देत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त आकाश कंदील बनविण्याचे रंगीत कागद शाळांमध्ये वितरित करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेले स्वच्छतेचे आकाश कंदील शाळाशाळांमध्ये स्वच्छता, प्लास्टिकमुक्ती आणि पर्यावरण संरक्षण, संवर्धनाचा संदेश देत झळकले.









### उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांच्या हस्ते

# सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान





ठाणे : जिल्हा परिषद ठाणे च्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक महिन्यात आनंददायी निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे या अनुषंगाने जुलै महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आज पार पडला. जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांच्या शुभहस्ते १९ अधिकारी व कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, पेन्शन आदेश देऊन सन्मान करण्यात आला. तसेच जुलै महिन्यात जिल्हा परिषदेचे एकूण १९ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विकासासाठी प्रदिर्घ काळ प्रशासकीय कामकाजात मोलाचा वाटा अधिकारी व कर्मचारी यांनी दिला आहे याबाबत त्यांचे पुढील आयुष्यात उत्तम आरोग्य रहावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी विस्तार अधिकारी (शिक्षण) शुभांगी पाठारी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की गेली ४० वर्षे ठाणे ग्रामीण भागात काम करून आज सेवानिवृत्त होताना आनंद होत आहे. हजारो विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी मोलाचे काम केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक) किर्ती डोईजोडे तसेच सर्व जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षण विभाग प्राथमिक १६, सामान्य प्रशासन ०२, आरोग्य विभाग ०१, असे जिल्हा परिषदेचे एकूण १९ अधिकारी व कर्मचारी जुलै महिन्यात सेवानिवृत्त झाले आहेत. सहाय्यक प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण), प्राथमिक शिक्षक, केंद्रप्रमुख, आरोग्य सेवक, शिपाई या पदावरील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहे.

### ठाणे लोकसभा मतदारसंघातील रेल्वे प्रश्नांबाबत खा. नरेश म्हस्के यांची केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा

# प्रश्न लवकर मार्गी लावणार : वैष्णव



ठाणे : खासदार नरेश म्हस्के यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची रेल भवन येथील कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेत अर्धा तास सविस्तर चर्चा केली. ठाणे लोकसभा मतदारसंघातील ठाणे, नवी मुंबई आणि मिरा-भाईंदर या प्रमुख रेल्वे स्थानकांमधील विविध प्रश्न, मुलभूत सुविधा आणि नवीन लांब पल्ल्याच्या गाड्या सोडणे याबाबत खासदार नरेश म्हस्के यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे लक्ष वेधले.

कोकण रेल्वे मार्गावर प्रामुख्याने ठाणे ते रत्नागिरी, सावंतवाडी, गोवा, मंगळूर आणि केरळ दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना येणाऱ्या अडचणी खासदार नरेश म्हस्के यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या समोर मांडल्या.

एलटीटी कुर्ला-मडगाव-मंगलोर रेल्वे मार्गावरील बहुतांश गाड्यांमध्ये जास्त गर्दी असल्याने आरक्षण उपलब्ध होत नाही. मुंबई शहर हे महानगर असल्याने या मार्गावर अधिकाधिक गाड्या चालविण्याची गरज असून त्यानुसार सीएसएमटी आणि एलटीटी कुर्ला तसेच ठाणे ते नाशिक, पुणे, मिरज येथेही पुरेशा टर्मिनल सुविधा नसल्याने प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरी ठाणे-मडगाव २ रोजच्या गाड्या, ठाणे-सावंतवाडी-२, ठाणे-मंगलोर - १ ठाणे-कोची/त्रिवेंद्रम - २, ठाणे-नाशिक - २, ठाणे-मिरज - १ आणि ठाणे-पुणे दररोज २ गाड्या सोडाव्यात तसेच ठाणे-बोरिवली मार्गावर ईएमयू गाडी सुरू करावी अशी मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.

ठाणे लोकसभा मतदारसंघ येणाऱ्या ठाणे, नवी मुंबई आणि मीरा-भाईंदर या प्रमुख रेल्वे स्थानकांमधून लाखो प्रवासी दररोज प्रवास करतात. येथून रेल्वे प्रशासनाला चांगला महसूल मिळतो. अशा रेल्वे स्थानकांचे रेल्वेने वेळोवेळी सर्वेक्षण केले पाहिजे जेणेकरुन त्या स्थानकांवर मूलभूत सुविधांची कमतरता कळू शकेल. जसे की प्रत्येक रेल्वे स्थानकावर पुरेशा प्रमाणात पुरुषांची स्वच्छतागृहे आणि महिलांची स्वच्छतागृहे असावीत. स्वच्छता लक्षात घेऊन प्रत्येक प्लॅटफॉर्मवर डस्टबिन असावेत. शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र प्रतीक्षा कक्ष, फूट-ओव्हर ब्रिज किंवा भुयारी मार्ग आणि एस्केलेटर अशा सुविधा होणे महत्त्वाचे आहे. भविष्यात प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन माझ्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून त्या दिशेने अर्थपूर्ण पावले उचलावीत अशी आशा चर्चे दरम्यान खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केली.

# कल्याणच्या सहजानंद चौकात होर्डिंग कोसळून अपघात

### दोन जण जखमी, प्रत्यक्षदर्शींनी सांगितला थरार

कल्याण : कल्याणच्या सहजानंद चौकात होर्डिंग कोसळून मोठा अपघात झाला आहे. सहजानंद चौक हा कल्याण शहरातला गजबजलेला चौक आहे. या चौकात ऐन गर्दीच्या वेळी भलं मोठं होर्डिंग कोसळून अपघात झाला आहे. या अपघातात दोन जण जखमी झाले आहेत.सहजानंद चौकात होर्डिंग कोसळल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. पोलीस या घटनास्थळी आले असून होर्डिंग हटवण्यासाठी अग्निशमन दलाचं पथकही आलं आहे.

### नेमकी काय घटना घडली?

कल्याणच्या सहजानंद चौकात होर्डिंग कोसळून दुर्घटना घडली. त्यानंतर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली. कल्याण पश्चिम भागात असलेला सहजानंद चौक हा अत्यंत गजबजलेला आणि रहदारीचा भाग आहे. या रस्त्यावर भलंमोठं होर्डिंग कोसळलं. या रस्त्याच्या एका बाजूला अनेक दुकानं तर दुसऱ्या बाजूला एक रुग्णालय आहे. या दुर्घटनेत दोन जण जखमी झाले. या जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

### वर्दळ फारशी नसल्याने मोठी दुर्घटना टळली

कल्याण पश्चिमेतील सर्वाधिक वर्दळीच्या सहजानंद चौकात शुक्रवारी सकाळी एक भव्य होर्डिंग कोसळून तीन पादचारी किरकोळ जखमी झाले. तर एका वाहनाचे नुकसान झाले आहे. होर्डिंग कोसळताना सुदैवाना त्या भागात पादचारी, वाहनांची वर्दळ कमी होती, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती, असे परिसरातील व्यापाऱ्यांनी सांगितलं.कल्याण डोंबिवली पालिका मुख्यालयापासून हाकेच्या अंतरावर ही दुर्घटना घडली आहे. होर्डिंग कोसळल्यानंतर काही वेळ या भागातील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. २० बाय १५ फूट आकाराच्या या होर्डिंगचा आधार सांगाडा लाकडाचा होता. गेल्या महिनाभर मुसळधार पाऊस पडत असल्याने या होर्डिंगच्या लाकडी आधाराचा सांगाडा सैल होऊन ते कोसळलं असण्याची शक्यता जाहिरात क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली.

### घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेनंतर फक्त कारवाईचं नाटक झालं

घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर कल्याण डोंबिवली पालिकेने सुरूवातीला शासन आदेशाप्रमाणे मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवरील, बेकायदा होर्डिंग, त्यांचे लोखंडी सांगाडे काढून टाकले. सुरूवातीचे पंधरा दिवस हे नाटक पालिकेकडून करण्यात आले. त्यानंतर बेकायदा होर्डिंग काढण्याची मोहीम थंडावली. सहजानंद चौकातील होर्डिंग कोसळण्यामागे पालिकेचा निष्काळजीपणा कारणीभूत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

### होर्डिंगमागे राजकीय मंडळींचा आशीर्वाद?

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील बहुतांशी होर्डिंग ही ठाण्यातील काही राजकीय मंडळींच्या आशीर्वादाने अनेक वर्ष लावली जात आहेत. या होर्डिंगवर कारवाई न करण्याचे अलिखित संकेत वरिष्ठांना आहेत. त्यामुळे पालिका अधिकारी माहिती असूनही अशा बेकायदा होर्डिंगवर कारवाई करण्यासाठी जात नसल्याचीही माहिती समोर आली आहे. महापालिकेतील वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्यांना फक्त आदेश देतात. त्यामुळे कनिष्ठ अधिकारी आदेशाचे पालन करून गप्प बसतात. आपल्या आदेशाचे कठोर पालन होते की नाही याची चाचपणी वरिष्ठ करत नसल्याची माहिती आहे.



ठाण्यातील येयूर गावात भात शेती मध्ये महिला भात पेरणी करताना महिला तसेच अत्याधुनिक पदाथने मशीन ने शेती करताना दिसत आहे. (छाया : मनोज सिंह)

### नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत

# ४ ऑगस्टला पाणी गुणवत्ता विशेष चाचणी मोहीम

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना स्वच्छ व शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा याकरिता दररोज घेण्यात येणाऱ्या पाणी नमुन्यांमध्ये पावसाळी कालावधी लक्षात घेता वाढ करून पाणी नमुने तपासणीची विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने पाणीपुरवठा विभागास देण्यात आले होते.

त्यास अनुसरून रविवार दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी पाणी गुणवत्ता चाचणी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून दररोज विविध ठिकाणांहून तपासण्यात येणाऱ्या ११० पाण्याच्या नमुन्यांमध्ये विशेष मोहीमेअंतर्गत लक्षणीय वाढ करीत वेगवेगळ्या भागांतून १ हजार पाण्याचे नमुने तपासण्यात येणार आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेमार्फत प्रतिदिन सरासरी ४६० द.ल.लि. इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. शहरातील नागरिकांना स्वच्छ आणि शुध्द पाणीपुरवठा व्हावा अशाप्रकारे आरोग्याच्या दृष्टीने महापालिकेमार्फत पुरविण्यात येत असलेल्या पिण्याच्या पाण्याचे नमुने विविध ठिकाणांवरून संकलित करून तपासण्यात येतात.

या अनुषंगाने महापालिका क्षेत्रात विविध भागांतून प्रतिदिन ११० पाण्याचे नमुने चाचणीकरीता घेण्यात येतात व मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत त्या नमुन्यांची गुणवत्ता चाचणी करण्यात येते.

सद्यास्थितीत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत स्वच्छ भारत मिशन मार्फत 'सफाई अपनाओ - बिमारी भगाओ' हे विशेष अभियान राबविले जात असून त्यामध्ये पावसाळी कालावधीत नागरिकांच्या आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने पाणी गुणवत्ता चाचणी विशेष मोहीम आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार राबविली जात आहे.

रविवारी सार्वजनिक सुट्टी असल्याने नागरिक घरी असतात हे लक्षात घेत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १००० पाणी नमुने तपासणीची ही विशेष मोहीम रविवार, दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी राबविण्यात येत आहे.

नमुंमपा क्षेत्रातील आठही विभागांत प्रत्येक विभागामध्ये १२० पाणी नमुन्यांची गुणवत्ता चाचणी घेण्यात येणार असून, मुख्य जलवाहिनीवरील १०० पाणी नमुन्यांची गुणवत्ता चाचणी घेण्यात येणार आहे.

या गुणवत्ता चाचणीमध्ये पिण्याच्या पाण्यातील की, Turbidity, TDS (Total Disssolved Solids), Residual Cholrine इत्यादी घटकांची चाचणी करण्यात येणार आहे. तसेच E-Coli ही चाचणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेमध्ये व कोकण भवन येथील शासनाच्या प्रयोगशाळेमध्ये करण्यात येणार आहे.

याशिवाय पुढील आठवड्यात पुन्हा एकदा १००० पाणी नमुने तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

ही विशेष मोहीम राबविण्यात येत असली तरी नियमितपणे केली जाणारी दररोज ११० पाणी नमुने तपासणी सुरूच रायामध्ये - झोपडपट्टी भाग, गावठाण क्षेत्र, नोड क्षेत्र, वाणिज्य क्षेत्र, शैक्षणिक व इतर संस्था तसेच घरोघरी पुरविण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांची चाचणी करण्यात येणार आहे.

नवी मुंबईकर नागरिकांना स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा मिळावा यादृष्टीने ही पाणी गुणवत्ता विशेष चाचणी मोहीम रविवार, दि. ४ ऑगस्ट २०२४ रोजी राबविण्यात येत असून आपल्याकडे पाणी नमुने तपासणीसाठी येणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना याकामी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# ऐरोली, वाशी, बेलापूर विभागात अतिक्रमण विरोधी मोहीम

ऐरोली : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामां विरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ.राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने विविध विभागांत पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी-विभाग ऐरोली अंतर्गत सेक्टर-०४, ऐरोली येथे घर क्र. बी-१९६, बी-१९७व क्यु-९२ यांचे आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचनाअधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदरचे अनधिकृत बांधकामावर ऐरोली विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले. तसेच सदर कारवाई अंतर्गत एकुण ३०,०००/- दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सी-विभाग वाशी अंतर्गत वाशी गांव येथे श्रीम. सुमन रामकृष्ण सुतार, घर क्र. ३०, वाशी गांव यांचे इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु होते. सदर अनधिकृत बांधकामास वाशी विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हुन हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदर अनधिकृत बांधकामावर वाशी विभागामार्फत तोडक मोहिमच आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अे-विभाग बेलापूर कार्यालया अंतर्गत करावे गांव नवी मुंबई संदिप तांडेल, घर क्र-०३, से-३६, करावेगाव, नवी मुंबई तसेच श्रीम. वत्सलाबाई शंकर तांडेल, सर्व्हे नं - १०८/११० करावे येथे नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. सदर संदिप तांडेल, घर क्र-०३, से-३६, करावेगाव, नवी मुंबई अनधिकृत बांधकामास अे-विभाग बेलापूर कार्यालया मार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदर अनधिकृत बांधकामावर बेलापूर विभागा मार्फत तोडक मोहिमच आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

# शासकीय कर्मचाऱ्यांचे ६ ऑगस्टपासून बेमुदत कामबंद आंदोलन

रोहा, : शासनाने घेतलेल्या निर्णयावर दिड वर्षांपासून अंमलबजावणी न केल्याच्या निषेधार्थ राज्यातील सर्व नगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतीमधिल कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करणार आहेत. रोहा नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी यात सहभागी होणार असून ७ ऑगस्ट रोजी कोकण भवन ते मंत्रालयावर निघणाऱ्या लाँगमार्चमध्ये सहभागी होणार आहेत.

याबाबतचे निवेदन प्रभा.मुख्याधिकारी पंकज भुसे यांना आज २ ऑगस्ट रोजी कर्मचारी संघटनेच्या वतीने देण्यात आले. यावेळी कामगार नेते रवींद्र आयनोडकर, युनियनचे अध्यक्ष सचिन दळवी, उपाध्यक्ष निलेश चाळके, सरचिटणीस जयेश बांबरकर, कार्यालय अधीक्षक काळे, रचना पार्टे, यशवंत नागोठकर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यातील सर्व नगर परिषदेचे कर्मचारी, नगर पंचायतींचे कर्मचाऱ्यांच्या प्रदिर्घकाळापासुन प्रलंबीत असलेल्या मागण्याबाबत २० मार्च २०२३ रोजी विधान भवन येथे झालेल्या बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. यावेळी राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव, वित्त विभाग सचिव, नगर विकास सचिव, सामाजीक न्याय विभाग सचिव, आयुक्त तसेच संचालक नगर पालिका संचालनालय उपस्थित होते. मात्र सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी गेले १ वर्ष ४ महीने उलटूनही झालेली नसल्यामुळे राज्यातील सर्व नगर परिषद व नगर पंचायत कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. शासनाने घेतलेल्या निर्णयावर अंमलबजावणी करण्याची आठवण करून देण्यासाठी राज्याताली कर्मचाऱ्यांनी १८ जून २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन केले होते. तसेच ९ जुलै २०२४ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले. मात्र शासनाने काहीही कार्यवाही केली नाही. यासर्व पार्श्वभूमीवर राज्यातील नगरपालिका, नगरपंचायच्या कर्मचाऱ्यांनी ६ ऑगस्टपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच दुसऱ्या दिवशी ७ ऑगस्ट रोजी कोकण भवन ते मंत्रालय असा लाँगमार्च काढण्यात येणार आहे.

# ठाण्यातील न्यू गर्ल्स स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ठरले

### राज्यातील पहिले लोकराज्य-कनिष्ठ महाविद्यालय

ठाणे : लोकराज्य या शासनाच्या मुखपत्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन पीपल्स एज्युकेशन सोसायटी, ठाणे संचलित न्यू गर्ल्स स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने याविषयी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. संस्थेचे अध्यक्ष आर.एस.आपटे, सचिव आल्हाद जोशी आणि उपसचिव बी.एस.तुरुकमाने यांनी या कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ११ वी व १२ वी च्या २५० विद्यार्थी-विद्यार्थिनींना लोकराज्य मासिकाचे सभासद बनवून या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्यासाठी एक आदर्श निर्माण केला आहे. आणि या निर्णयास मूर्त स्वरूप देण्यासाठी या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किरणकुमार चव्हाण व त्यांच्या सहकारी प्राध्यापकांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. अशा प्रकारचे सदस्यत्व लोकराज्य मासिकाचे सदस्यत्व स्वीकारणारे हे कनिष्ठ महाविद्यालय आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील महाराष्ट्र राज्यातील पहिले कनिष्ठ महाविद्यालय ठरले आहे.

पीपल्स एज्युकेशन सोसायटी, ठाणे, ही ठाण्यातील एक जुनी नावाजलेली शैक्षणिक संस्था आहे. १९२६ साली न्यू इंग्लिश स्कूल, १९३६ मध्ये न्यू गर्ल्स स्कूल, १९५६ भारत नाईट स्कूल, १९७५ इंग्लिश मीडियम स्कूल, २०११ - सीबीएससी स्कूल (१), २०२२ - सीबीएससी स्कूल (२) या शाळांची पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेद्वारे स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेचे ९८ वे वर्ष सुरू असून पुढील दोन वर्षांनी संस्थेचे शतक महोत्सवी वर्ष साजरे करण्यात येणार आहे.

संस्थेतील विद्यार्थी हे अतिशय सर्वसामान्य कुटुंबातील असून या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने अभ्यास करताना महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या लोकाभिमुख निर्णयांची माहिती व्हावी, शासनाकडून जनतेसाठी कशा प्रकारचे निर्णय राबविले जातात, याची माहिती होण्यासाठी या मासिकाचे वाचन निश्चितच उपयुक्त ठरणार आहे, असा विश्वास संस्थेचे सचिव आल्हाद जोशी यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी राज्यातील इतर शाळा व महाविद्यालयांनाही लोकराज्य मासिकाचे सभासद होण्यासाठी आवाहन केले आहे. या कनिष्ठ महाविद्यालयास येत्या दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभाच्या वेळी लोकराज्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१